# जिल्हाधिकारीतथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय,नांदेड.

पत्ता :गांधी पुतळयाजवळ,स्टेशन रोड नांदेड. फोन- ०२४६२-२३७१०१, Email :nandedrdc@gmail.com

**जा.क्र.२०२०/आरबी-१/डेस्क२/टे-४/crpc-१४४/प्र.क्र.- १३** **दिनांक. ११.०७.२०२०**

वाचाः- या कार्यालयाचे दिनांक १२.०७.२०२० रोजी मध्यरात्री पासून ते दिनांक २०.०७.२०२० च्या मध्यरात्री पर्यंत संचारबंदी लागू केलेले समक्रमांकीत आदेश दिनांक १०.०७.२०२०

**विषयः** कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्याच्या अनुषंगाने नांदेड जिल्हयात उक्त विषाणूंची साखळी तोडण्यासाठी व खबरदारीचा उपाय म्हणून दिनांक १२.०७.२०२० रोजी मध्यरात्री पासून ते दिनांक २०.०७.२०२० च्या मध्यरात्री पर्यंत संचारबंदीमध्ये सुधारित/अतिरिक्त निर्देश.

## आदेश

या कार्यालयाचे संदर्भीय आदेश दिनांक १०.०७.२०२० अन्वये नांदेड जिल्हयात अ.क्र.०१ ते १९ वर बाबीं,आस्थापना, व्यक्ती व समूहाला संचारबंदीतून नियम व अटीच्या अधीन राहून सुट देण्यात आली होती त्यामध्ये याआदेशाव्दारे खालील प्रमाणे सुधारित/अतिरिक्त निर्देश देण्यात येत आहेत. त्याव्यतिरिक्त इतर निर्देश कायम राहतील.

**सुधारित निर्देश-**

**१)** संदर्भाधीन आदेशातील अ.क्र.०५, ०६, ०७, व ०९ वर नमूद भाजीपाला व फळे विक्री एका ठिकाणी न थांबता हातगाडे वर गल्ली,कॉलोनी,सोसायटी मध्ये विक्री करणे बाबत, दुध विक्रेत्यांना एका ठिकाणी थांबून दुध विक्री न करता गल्ली,कॉलोनी,सोसायटी मध्ये विक्री करणे बाबत, जार वॉटर सप्लायर्स यांना सामाजिक अंतराचे पालन करुन ग्राहकांना घरपोच सेवा देणे बाबत, घरगूती गॅस घरपोच सेवा देणे करिता सकाळी ०७.०० ते दुपारी ०२.०० वाजपर्यंत मुभा देण्यात आली होती.

*त्याऐवजी*

**वरील नमूद बाबींना याव्दारे सकाळी ०७.०० ते १०.०० या कालावधीत घरपोच विक्रीची/सेवा देण्याची मुभा देण्यात येत आहे.**

**२)** संदर्भाधीन आदेशातील अ.क्र.१७ वर नमूद बँकेत केवळ अत्यावश्यक सेवांअतर्गत शासनखाती चलनद्वारे रक्कम भरून घेण्याचे कामास व बँकेचे स्वतःचे कार्यालयीन कामास मुभा राहील. तसेच इतर व्यवहाराच्या अनूषंगाने १० पेक्षा जास्त ग्राहक असणार नाहीत याची शाखा व्यवस्थापकांनी पुर्व दिलेल्या अटी व शर्तीनूसार नियोजन करावे

*त्याऐवजी*

**नांदेड जिल्हयातील सर्व बँकेचे कर्मचारी हे त्यांचे अंतर्गत कार्यालयीन कामाकाज बँकेत उपस्थित राहून करु शकतील त्याव्यतिरिक्त बॅकेत शासकिय कार्यालयाचे बँकेशी निगडीत शासकिय व्यवहार चालू राहतील तथापी इतर कोणतेही ग्राहकांना बँकेत येण्यास प्रतिबंध राहिल.**

**अतिरिक्त निर्देश-**

संदर्भाधीन आदेशातील अ.क्र.१९ नंतर खालील प्रमाणे अ.क्र.२० व २१ म्हणून अतिरिक्त निर्देश देण्यात येत आहेत.

२०. मान्सुन सबंधीत कामे पुर्ण करण्यासाठी यापुर्वी देण्यात आलेल्या अटी व शर्तीचे अधीन राहून उक्त कामे चालू ठेवण्यास मुभा राहिल.

२१. कोणतेही खाजगी दुचाकी/तिनचाकी/चारचाकी व ईतर वाहनाव्दारे व्यक्तींना प्रवासास बंदी राहिल तथापी अत्यावश्यक वैद्यकिय कारणासाठी तसेच परवानगी प्राप्त असलेल्या राज्याअंतर्गत, अंतरराज्य प्रवासाच्या वाहतूकीस मुभा राहिल.

COLLECTOR & DISTRICT MAGISTRATE NANDED Dist.

(डॉ.विपीन इटनकर)भा.प्र.से.
जिल्हादंडाधिकारी नांदेड.

D PC CORONA

Scanned by CamScanner

# जिल्हाधिकारीतथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय,नांदेड.

पत्ता :गांधी पुतळयाजवळ,स्टेशन रोड नांदेड. फोन- ०२४६२-२३७१०१, Email :nandedrdc@gmail.com

**जा.क्र.२०२०/आरबी-१/डेस्क२/टे-४/crpc-१४४/प्र.क्र.- १३** **दिनांक. ११.०७.२०२०**

**विषयः** कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्याच्या अनुषंगाने नांदेड जिल्हयात उक्त विषाणूंची साखळी तोडण्यासाठी व खबरदारीचा उपाय म्हणून दिनांक १२.०७.२०२० रोजी मध्यरात्री पासून ते दिनांक २०.०७.२०२० च्या मध्यरात्री पर्यंत संचारबंदीमध्ये सुधारित/अतिरिक्त निर्देश.

**प्रतिलिपी- माहीतीस्तव सादर**

१. मा.विभागीय आयुक्त औरंगाबाद.

**प्रतिलीपी - आवश्यकत्या कार्यवाहीस्तव**

२. आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
३. पोलीस अधिक्षक, नांदेड
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड
५. सर्व उपविभागीय दंडाधिकारी नांदेड जिल्हा
६. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड
७. सर्व पोलीस उपविभागीय अधिकारी, नांदेड जिल्हा
८. सर्व तालुका दंडाधिकारी नांदेड जिल्हा
९. व्यवस्थापक, जिल्हा अग्रणी बँक, नांदेड
१०. सर्व संबंधित विभाग प्रमुख यांना अनुपालनास्तव
११. जिल्हा माहीती अधिकारी नांदेड यांना व्यापक प्रसिध्दीस्तव.

COLLECTOR & DISTRICT MAGISTRATE NANDED Dist.

जिल्हादंडाधिकारी नांदेड.

Scanned by CamScanner